**श्री.एम.एम.दिवे,सेवानिवृत्त वरिष्ठ सहाय्यक (लेखा) यांचे गैरव्यवहार/गैरवर्तणूकीबाबत त्यांचेविरुध्द शिस्तभंगविषयक कारवाई करणेबाबत...**

अहिल्यानगर जिल्हा परिषद

अर्थ विभाग

क्र. अर्थ/कार्या-१/आस्था-१/११७/२०२५

अहिल्यानगर दिनांक १९/०३/२०२५

वाचा:- १) या कार्यालयाचे ज्ञापन/दोषारोप पत्र जा.क्रं.वशि/कार्या-१/आस्था-१/२३४/२०१२ दिनांक ११/०९/२०१२

२) श्री.एम.एम.दिवे,तत्कालीन वरिष्ठ सहाय्यक लेखा यांनी सादर केलेला खुलासा दिनांक २५/१०/२०१२

३) महा.जि.प.जि.से.(शिस्त व अपील) नियम १९६४ चे भाग ३ नियम ४

४) महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ मधील नियम २७

५) या कार्यालयाकडील अंतिम कारणे दाखवा नोटीस जा.क्रं.अर्थ/कार्या-१/आस्था-/२७३/२०२३ दिनांक ०२/०८/२०२३

तुम्ही अर्थ विभाग, जिल्हा परिषद अहमदनगर येथे कार्यरत असतांना तुम्ही केलेल्या गैरवर्तनाबाबत तुमचेवर संदर्भ क्र. १ अन्वये दोषारोप ठेवून त्याबाबत दहा दिवसाचे आत अभिवेदन सादर करणेबाबत फर्मावि‍णेत आले होते.

आपण संदर्भ क्रं.१ अन्वये बजावलेल्या दोषारोप पत्रास संदर्भ क्रं.२ अन्वये खुलासा सादर केलेला होता.तथापी आपण आपल्यावरील आरोप अमान्य केलेले आहेत व सदर खुलासा असमाधानकारक आहे.

वरिलप्रमाणे संदर्भ क्रमांक १ मध्ये नमुद असलेनुसार तुम्ही दिनांक २४/०२/२००९ व दिनांक २५/०२/२००९ या कालावधीचे कुठल्याही प्रकारचे रजेचे आवेदनपत्र न सादर करता अनाधिकाराने स्वत:चे अधिकारात अनधिकृत गैरहजर राहीले आहात. तसेच दिनांक ०३/०८/२०१० ते ०७/०८/२०१० रोजी कार्यालयीन हजरेपत्रकावर फिरती नोंदवलेली आहे.तथापी त्याकामी उपस्थितीतीचे प्रमाणपत्र सादर केलेले नाही. तसेच आपण दिनांक २७/०८/२०१० ते २५/०९/२०१० या कालावधीचे रजेचे आवेदनपत्र सादर केले आहे.तथापी त्यानंतर तुम्ही दिनांक २४/०३/२०११ पर्यंत कार्यालयीन कामी हजर झालेला नाहीत. व त्याबाबतही आपण अनाधिकाराने स्वत:चे अधिकारात अनधिकृत गैरहजर राहीले आहात.

तुम्ही ए.बा.वि.से.यो.श्रीगोंदा या कार्यालयात कार्यरत असतांना दिनांक २०/१०/२००८ पासुन तेथील कॅश बुक नमुना नं.७ व रोकड नोंदवही नमुना नं.४ हे वेळीच पुर्ण करुन अदयावत ठेवलेले नाही. त्यामुळे प्रशासकीय कामकाजात अडचण निर्माण झालेली आहे.

त्याप्रमाणे प्रस्तुत दोषारोप पत्रास संदर्भ क्रमांक २ तुम्ही सादर केलेला खुलासा असमाधानकारक असल्याने उक्त नमुद दोषारोपातील गैरवर्तनामुळे तुमचेकडून महाराष्ट्र जिल्हा परिषद.जिल्हा सेवा (वर्तणुक) नियम १९६७ (३) चे उल्लंघन केल्याचे सिध्द होत आहेत.त्याप्रमाणे तुम्ही खात्यामार्फत होणा-या शिस्तभंग विषयक कार्यवाहीस पात्र ठरत असल्याने तुमचेविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ मधील नियम २७ मधील तरतुदीनुसार आपल्याला दरमहा प्राप्त होणा-या सेवानिवृत्ती वेतनातील १० टक्के दोन वर्षासाठी इतक्या कालावधीसाठी काढून का घेण्यात येऊ नये? याबाबत संदर्भ क्रमांक ५ अन्वये आपणास नोटीस देऊन त्याचा लेखी खुलासा नोटीस मिळालेपासून दहा दिवसाचे आत करणेबाबत तुम्हांस फर्मावि‍णेत आलेले होते. तथापी आपण सदर अंतिम कारणे दाखवा नोटीसला उत्तर दिलेले नाही.सबब आपले काही एक म्हणणे नाही.असे समजण्यात येऊन पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

उपरोक्त नमुद प्रमाणे तुम्ही स्वत:चे अधिकारात गैरहजर राहून कार्यालयीन कामी हलगर्जीपणा व गैरवर्तन केल्याने महाराष्ट्र जिल्हा परिषद.जिल्हा सेवा (वर्तणुक) नियम १९६७ (३) चे उल्लंघन केल्याचे सिध्द होत आहेत. त्याप्रमाणे तुम्ही खात्यामार्फत होणा-या शिस्तभंग विषयक कार्यवाहीस पात्र ठरतात. सबब आपलेविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ मधील नियम २७ मधील तरतुदीनुसार आपल्याला **दरमहा प्राप्त होणा-या सेवानिवृत्ती वेतनातील १० टक्के रक्कम दोन वर्षे इतक्या कालावधीसाठी काढून घेण्यात येत आहे.**हि शिक्षा अंतिम करण्यात येत आहे.

सदरचा आदेश जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यांत आला असुन त्याचा संकेतांक क्र. २०२५०३१९०५००१४ असा आहे.

Signed by
Ashish Mukundrao Yerekar
Date: 19-03-2025 14:06:59
(आशिष येरेकर भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

श्री.एम.एम.दिवे,सेवानिवृत्त वरिष्ठ सहाय्यक (लेखा)
ए.बा.वि.से.यो.प्रकल्प श्रीगोंदा,जि.प.अहिल्यानगर

प्रत : बालविकास प्रकल्प अधिकारी,ए.बा.वि.से.यो.प्रकल्प श्रीगोंदा

२/- सोबतचा आदेश श्री.एम.एम.दिवे,सेवानिवृत्त वरिष्ठ सहाय्यक (लेखा) यांना बजावणेत येऊन सदर आदेशाची नोंद श्री.दिवे यांचे मुळ सेवापुस्तकात घेऊन त्याची प्रमाणित केलेली छायांकीत प्रत इकडेस सादर करण्यात यावी.

प्रत- गटविकास अधिकारी, पंचायत समिती,श्रीगोंदा

२/- वरिल आदेशाची अंमलबजावणी करुन श्री.एम.एम.दिवे,सेवानिवृत्त वरिष्ठ सहाय्यक (लेखा) यांचे सेवानिवृत्ती वेतनातून आदेशित केलेप्रमाणे रक्कम आदेशातील कालावधीसाठी कपात करण्यात यावी.